न्यूज एक्सप्रेस मराठी
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# प्रशासकीय राजवट संपून लोकाभिमुख कारभाराचे पर्व सुरु

## सभागृह शहराच्या प्रगतीचा वेग अधिक वाढवेल, असा विश्वास सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी व्यक्त केला

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेवर गेल्या ३ वर्षे, १० महिने आणि २४ दिवसांपासून असलेली प्रशासकीय राजवट आज संपुष्टात आली आहे. नवनिर्वाचित महापौर रवी लांडगे आणि उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या निवडीमुळे शहरात पुन्हा एकदा लोकाभिमुख कारभाराचे पर्व सुरू झाले असून, हे सभागृह शहराच्या प्रगतीचा वेग अधिक वाढवेल, असा विश्वास सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी व्यक्त केला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर निवडीसाठी आयोजित विशेष सर्वसाधारण सभेत महापौरपदी रवी लांडगे आणि उपमहापौरपदी शर्मिला बाबर यांची बिनविरोध निवड झाली. या निवडीनंतर त्यांचे अभिनंदन करताना प्रशांत शितोळे बोलत होते. यावेळी भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका आदी उपस्थित होते.



"महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली हे नवीन सभागृह शहराच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देईल. सभागृहात मतभेद असू शकतात, पण मनभेद न ठेवता शहराच्या विकासासाठी आम्ही सर्व एकत्र काम करू," असेही सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी यावेळी नमूद केले.

### पारदर्शक कारभाराची सुरुवात..

» यावेळी बोलताना प्रशांत शितोळे म्हणाले की, "दीर्घकाळ प्रशासक राजवट असल्यामुळे नागरिकांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ नव्हते. आज महापौर आणि उपमहापौरांच्या निवडीमुळे सामान्यांच्या आवाजाला सभागृहात स्थान मिळाले आहे. नवनिर्वाचित महापौर व उपमहापौर सभागृहाचे कामकाज शिस्तबद्ध, पारदर्शक व लोकाभिमुख ठेवतील. प्रत्येक सदस्याला, मग तो कोणत्याही पक्षाचा असो, शहराच्या हितासाठी बोलण्याची समान संधी मिळेल याची आम्हाला खात्री आहे."

### निवड प्रक्रिया संक्षिप्त..

» महापौर पद –रवी लांडगे यांचा एकमेव अर्ज आल्याने, निवडणूक अधिकारी तथा सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी सकाळी ११:२० वाजता त्यांची बिनविरोध निवड जाहीर केली.

» उपमहापौर पद – शर्मिला बाबर यांच्या विरोधात राष्ट्रवादीच्या वैशाली काळभोर यांनी अर्ज भरला होता, मात्र त्यांनी तो मागे घेतल्याने बाबर यांचीही बिनविरोध निवड झाली.

### नियोजनबद्ध विकासाचा वारसा पुढे नेणार..

» शहराच्या वैभवाचा उल्लेख करताना शितोळे पुढे म्हणाले, "पिंपरी-चिंचवड हे केवळ लोकसंख्येने मोठे शहर नाही, तर नियोजनबद्ध विकास आणि शिस्तीमुळे देशात आदर्श ठरले आहे. भाजपाला नागरिकांच्या पाठिंब्याने जे मोठे यश मिळाले आहे, तो विश्वास हे सभागृह सार्थ ठरवेल. मेट्रो, पायाभूत सुविधा आणि आयटी क्षेत्रातील प्रगतीला आता अधिक गती दिली जाईल."

# दहावी-बारावी परीक्षांसाठी सीसीटीव्ही सक्तीचे; पिंपरीत 90 टक्के केंद्रे सज्ज

## कॉपिमुक्त अभियानांतर्गत राज्य मंडळाचा कडक निर्णय; सीसीटीव्ही नसलेल्या केंद्रांवर कर्मचाऱ्यांची अदलाबदल शक्य

**पिंपरी | प्रतिनिधी**

दहावी-बारावीच्या परीक्षेसाठी महाराष्ट्र राज्य मंडळाने कॉपिमुक्त अभियानांतर्गत सर्व परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे अनिवार्य केले आहेत. या नियमानुसार प्रत्येक वर्गात कॅमेरा असणे सक्तीचे केल्यामुळे शहरातील 90 टक्के केंद्रांवर ही सुविधा उपलब्ध केली आहे.

राज्य मंडळामार्फत 2025-26 साठी बारावीची परीक्षा 10 तर दहावीची परीक्षा 20 फेब्रुवारीला होणार आहे. दहावी आणि बारावीच्या परीक्षांदरम्यान किती परीक्षा केंद्रांवरील परीक्षागृहांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणा कार्यन्वित आहे, याची चाचपणी राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत सुरू केली आहे. ज्या परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेराची सुविधा उपलब्ध असेल, त्या केंद्रांनाच मान्यता दिली जाणार आहे. याबाबत यंदा मंडळामार्फत परीक्षा केंद्रावरील परीक्षागृहांमध्ये सीसीटीव्हीची सुविधा आहे की, नाही यावर अधिक भर दिला जात आहे.



राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सूचनेनुसार परीक्षा केंद्रासाठी केवळ सीसीटीव्हीच नव्हे, तर केंद्राच्या चारही बाजूंनी पक्की संरक्षक भित्, खिडक्याना लोखंडी जाळ्या, प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्र बाक, मुलीसाठी स्वतंत्र व पुरेशी स्वच्छतागृहे आदी सुविधाही बंधनकारक केल्या आहेत. राज्य मंडळामार्फत 2025-26 साठी बारावीची परीक्षा 10 तर दहावीची परीक्षा 20 फेब्रुवारीला होणार आहे. दहावी आणि बारावीच्या परीक्षांदरम्यान किती परीक्षा केंद्रांवरील परीक्षागृहांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणा कार्यन्वित आहे, याची चाचपणी राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत केली आहे.

### सर्व कर्मचाऱ्यांची अदलाबदल

» राज्य मंडळामार्फत इयत्ता 10 वी व 12 वी परीक्षांबाबत चर्चा करण्यासाठी राज्य मंडळ व अनेक राज्य व विभागीय शिक्षक, मुख्याध्यापक संघटना पदाधिकारी यांच्या सहविचार सभा राज्य मंडळ कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी परीक्षा केंद्रावरील कर्मचाऱ्यांची अदलाबदली संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. या वेळी सरसकट सर्व परीक्षा केंद्रांवरील कर्मचाऱ्यांची अदलाबदल न करता ज्या केंद्रावर सीसीटीव्ही उपलब्ध होणार नाहीत, अशा केंद्रावरील सर्व कर्मचाऱ्यांची अदलाबदल करण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळण्याची विनंती केली आहे.

# चिंचवड देवस्थान 'ब' दर्जा पर्यटन क्षेत्र करण्यासाठी प्रयत्न करणार : आमदार शंकर जगताप

## विशेष निधीमधून श्री मोरया गोसावी मंदिर परिसर सुशोभीकरण कामाचं भूमिपूजन...



**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड देवस्थान ट्रस्टने कायमच सामाजिक बांधिलकी जपली आहे. सेवा कार्याला धार्मिक अनुष्ठानाची जोड देत समाजात एक आदर्श कायमच स्थापित ठेवला. आरोग्य, स्वच्छता, अनेक सामाजिक कार्यातून मानवतावादी दृष्टिकोन राखला. ज्यातून अनेक प्रकारचे मापदंड प्रस्थापित झाले. आगामी काळात हे आदर्शवत कार्य महाराष्ट्राच्या बाहेरही सर्वदूर पोहोचावे यासाठी देवस्थानला "ब" दर्जा पर्यटन क्षेत्र म्हणून ओळख मिळावी यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आमदार शंकर जगताप यांनी सांगितले. भविष्यात जास्तीत जास्त निधी देवस्थानला मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल. भाविकांना त्या माध्यमातून चांगल्या सुविधा मिळतील असे देखील त्यांनी यावेळी सांगितले.

"क" दर्जा पर्यटन विशेष निधी मधून श्रीमन् महासाधू श्री मोरया गोसावी मंदिर परिसर सुशोभीकरण कामाचा भूमिपूजन सोहळा चिंचवड येथे मंदिराच्या प्रांगणात गुरुवारी पार पडला. यावेळी माजी महापौर तथा नगरसेविका अपर्णा डोके, नगरसेवक सुरेश भोईर, अनंत कोऱ्हाळे, नगरसेविका मनीषा चिंचवडे, आशा सूर्यवंशी, मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव, विश्वस्त जितेंद्र महाराज देव, विक्रम दौंडकर तसेच आजी माजी नगरसेवक, भाजप पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार शंकर जगताप पुढे म्हणाले, श्रीमन् महासाधू मोरया गोसावी यांचे नाव महाराष्ट्रात सर्वदूर परिचित आहे. हिंदू धर्मात पाच मुख्य संप्रदाय आहेत. सूर्योपासक, शैव, वैष्णव, गाणपत्य आणि शाक्त. यातील 'गाणपत्य' संप्रदाय हा गणपतीलाच मूळ परब्रह्म मानतो. या संप्रदायाच्या गौरवशाली इतिहासातील एक अग्रणी आणि देदीप्यमान ऋषी म्हणजे चिंचवडचे परमपूज्य श्री मोरया गोसावी. म्हणूनच चिंचवडचे मोरया गोसावींचे स्थान, महाराष्ट्रातील गाणपत्य संप्रदायाचे आद्यपीठ म्हणून अत्यंत आदराने घेतले जाते. अशा परम पवित्र देवस्थान आणि मोरया गोसावींच्या चरणी सेवा रुजू करण्याचे संधी मला मिळाली हे मी माझे भाग्य समजतो.

दरम्यान आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते पवना नदीची आरती करून नदी स्वच्छतेची शपथ यावेळी घेण्यात आली. जितेंद्र महाराज देव यावेळी म्हणाले, "मोरयाचा धर्म जागवण्या" चे काम आमदार शंकर जगताप यांच्या माध्यमातून देवस्थान ट्रस्ट अधिक वेगाने करत आहे. २०२२ मध्ये या देवस्थानला "क" पर्यटन दर्जा प्राप्त झाला. मात्र त्यानंतर पाठपुरावा आणि निधी मिळवण्याचे काम आमदार जगताप यांच्या प्रयत्नांमुळे तडीस गेले.

> श्रीमन् महासाधू मोरया गोसावी मंदिर परिसरात होणार असलेली ही विकासकामे केवळ भौतिक स्वरूपातील नसून, ती श्रद्धा, संस्कृती आणि परंपरेला पुढील पिढीपर्यंत घेऊन जाणारी आहेत. महासाधू मोरया गोसावी महाराजांनी दिलेल्या मूल्यांवर आधारित सेवा, समर्पण आणि सामाजिक ऐक्य या भावनेतूनच हा विकास घडत आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या प्रेरणेतून व मार्गदर्शनाखाली हे कार्य आकार घेत असून, शासन–प्रशासन, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि भाविक यांच्या संयुक्त प्रयत्नातून मंदिर परिसराचा सर्वांगीण विकास साधला जात आहे. या विकासकामांमुळे केवळ पायाभूत सुविधा सक्षम होणार नाहीत, तर आध्यात्मिक चेतना अधिक दृढ होऊन समाजात सांस्कृतिक एकात्मतेचा संदेश अधिक व्यापकपणे पोहोचेल.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

या कामांसाठी २ कोटी ५० लाखांचा निधी

मंदिर परिसर व मंगलमुर्ती वाडा परिसर सुशोभीकरण करणे ( २५ लक्ष), पादुकामंदिर, सभा मंडप, संरक्षण भिंत उभारणे (५० लक्ष), मुख्य प्रवेशद्वार जतन संवर्धन व दर्जा वाढ करणे (२५ लक्ष), पेव्हिंग ब्लॉक, दगडी टप्पा, स्टेनलेस स्टील रेलिंग, चुन्याची पॉइलिंग, सोलिंग, मुरूम फिटिंग( ५० लक्ष), अत्याधुनिक स्वच्छतागृह बांधणे (१५ लक्ष), पाण्याची टाकी बांधणे (२५ लक्ष), अन्नदानासाठी छत्र बांधणे (२५ लक्ष), भाविकांसाठी बसण्याची व्यवस्था करणे (१० लक्ष),

मंदिर परिसरात सभोवतीच्या पटांगणामध्ये दगडी पायऱ्यांचे बांधकाम करणे (२५ लक्ष) या कामांचा समावेश आहे. या कामांसाठी २ कोटी ५० लाखांचा निधी प्राप्त झाला आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेत स्वीकृत नगरसेवकपदी ज्येष्ठ पत्रकाराला प्रतिनिधीत्व मिळावे!

## 'प्रेस क्लब ऑफ पिंपरी-चिंचवड'ची भूमिका : शहराच्या विकासात प्रसारमाध्यमांचे अनन्यसाधारण योगदान!




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासात आपल्या लेखणीच्या माध्यमातून सातत्यपूर्ण, निर्भीड आणि सकारात्मक योगदान देणाऱ्या पत्रकार प्रतिनिधीला पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत स्वीकृत सदस्य (नगरसेवक) म्हणून नियुक्त करण्यात यावे. यासाठी सत्ताधारी भारतीय जनता पार्टी आणि विरोधी बाकावरील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी प्रेस क्लब ऑफ पिंपरी-चिंचवडच्या वतीने करण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला 128 पैकी 84 जागा इतक्या जागा मिळालेल्या आहेत. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला 37 आणि शिवसेना शिंदे गटाला 5 तर इतर 1 अशी बलाबल आहे. मिळालेल्या जागांच्या संख्येनुसार, भाजपाला 7, राष्ट्रवादीला 3 स्विकृत नगरसेवक करता येणार आहेत.

शहरातील नागरी प्रश्न, पायाभूत सुविधा, पर्यावरण, आरोग्य, शिक्षण, वाहतूक, औद्योगिक विकास तसेच प्रशासनातील पारदर्शकता याबाबत सातत्याने लेखन करून लोकशाही व्यवस्थेला बळकटी देण्याचे काम पत्रकारांनी केले आहे. विशेषतः ज्येष्ठ पत्रकार माधव सहस्त्रबुद्धे, अरुण नाना कांबळे, अविनाश चिलेकर, विवेक इनामदार, मिलिंद वैद्य, नंदकुमार सातुर्डेकर, मनोज मोरे, अनिल वडघुले, बापुसाहेब गोरे, बाळासाहेब ढसाळ आणि डॉ. विश्वास मोरे यांनी आपल्या प्रदीर्घ पत्रकारितेच्या अनुभवातून शहराच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले आहे.

या पत्रकारांनी केवळ समस्या मांडण्यापुरते मर्यादित न राहता, विकासकामांतील त्रुटी, नागरिकांचे प्रश्न, प्रशासनाच्या निर्णयांवरील सकारात्मक तसेच चिकित्सक मांडणी आणि लोकहिताच्या विषयांवर सातत्याने आवाज उठवला आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहराच्या विकास प्रक्रियेत माध्यमांची भूमिका मार्गदर्शक आणि समाजहिताची राहिली आहे. महानगरपालिकेच्या स्वीकृत सदस्यपदी अनुभवी आणि समाजाभिमुख पत्रकाराची नियुक्ती झाल्यास प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्यात अधिक परिणामकारक संवाद निर्माण होईल. यामुळे विकासकामांमध्ये पारदर्शकता वाढून लोकशाही मूल्यांना अधिक बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

### स्वीकृत नगरसेवक म्हणजे काय?

» स्वीकृत नगरसेवक हा महापालिकेच्या सर्वसाधारण सभेतील एक विशेष सदस्य असतो. त्याची निवड थेट जनतेद्वारे होत नाही. शहरातील अनुभवी, कार्यकुशल आणि विविध क्षेत्रात (प्रशासन, कायदा, आरोग्य, अभियांत्रिकी, शिक्षण, सामाजिक सेवा इ.) योगदान देणाऱ्या व्यक्तींना ही संधी दिली जाते. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार शासकीय अधिकारी, वकील, डॉक्टर, पत्रकार, अभियंते, शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य तसेच सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींचा यात समावेश अपेक्षित असतो.

औद्योगिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या वेगाने प्रगती करणाऱ्या पिंपरी-चिंचवड शहराच्या विकास प्रवासात माध्यमांचे योगदान दुर्लक्षित करता येणार नाही. त्यामुळे महानगरपालिकेने या मागणीचा सकारात्मक विचार करून पत्रकार प्रतिनिधीची स्वीकृत सदस्यपदी नियुक्ती करावी, अशी अपेक्षा विविध राजकीय, सामाजिक आणि पत्रकार संघटनांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# पुण्यातील 'ओव्हर हेड केबल'बाबत झाला मोठा निर्णय!

## शहरातील जीवघेण्या केबल्सवर 'सर्जिकल स्ट्राईक'; आयुक्तांनी दिले कडक आदेश.

**पुणे | प्रतिनिधी**

पदपथांवर तसेच सर्रासपणे टाकल्या जाणाऱ्या 'ओव्हर हेड केबल'चा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. बेकायदा पद्धतीने कोणाचीही परवानगी न घेता शहरातील अनेक भागांमध्ये टाकण्यात येत असलेल्या ओव्हर हेड केबलचे सर्वेक्षण करून त्याचे धोरण एका महिन्यात तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी याबाबतचे आदेश दिले असून, पुढील महिन्यात धोरण तयार केले जाणार आहे. त्यानंतर बेकायदा पद्धतीने टाकण्यात येणाऱ्या ओव्हरहेड केबलवर कारवाई करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. ओव्हरहेड केबलमुळे अपघात होण्याचे प्रकार घडले आहेत.

शहर परिवर्तन कक्षाच्या पहिल्या बैठकीत आयुक्त राम यांनी आदेश दिले. बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांची तसेच चर्चेची माहिती महापालिका आयुक्त राम यांनी पत्रकार परिषदेत दिली.

राम म्हणाले, 'शहरातील अनेक भागांतील पदपथांवर तसेच ओव्हर हेड केबलमुळे अडथळा निर्माण होते. विद्युत खांब, झाडे यांच्यावरून मोठ्या प्रमाणात इंटरनेटच्या केबल टाकल्या जातात. त्या बाबतचे धोरण महापालिकेकडे नाही. त्यामुळे जबाबदारी निश्चित करताना अनेकदा मर्यादा येतात. त्यामुळे या बैठकीत शहरातील ओव्हर हेड केबल बाबतचे धोरण पुढील एका महिन्यात तयार करून शहर परिवर्तन कक्षाच्या बैठकीत ठेवावे, अशा सूचना करण्यात आल्या आहेत. महापालिका तसेच महावितरण, बीएसएनएल विभागातील अधिकारी यामध्ये समन्वयाने काम करून धोरण तयार करणार आहेत.'

शहरातील पदपथांवर महावितरणचे फीडर पॉइंट (डीपी) बसविण्यात आले आहेत. यांची संख्या सुमारे अडीच ते तीन लाखांच्या घरात आहे. पदपथांवर हे डीपी असल्याने पादचाऱ्यांना चालताना त्रास होतो. नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होतो. त्यावरही तोडगा काढला जाणार आहे. काही भागांतील रस्ते रुंद केल्यानंतर जुने विजेचे खांब अद्यापही तसेच ठेवण्यात आलेले आहेत.

महावितरण कंपनीकडे पाठपुरावा केल्यानंतर निधी नसल्याचे कारण दिले जाते. रस्त्यांवर असलेल्या विजेच्या खांबांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. त्यामुळे महापालिकेने अंदाजपत्रकात ३४ कोटी रुपयांचा निधी खांब हलविण्यासाठी ठेवल्याचे आयुक्त राम यांनी सांगितले.



### कात्रज-कोंढवा रस्त्याचे रखडलेले भूसंपादन १५ दिवसांत पूर्ण

» कात्रज-कोंढवा रस्त्याचे काम भूसंपादनामुळे रखडले आहे. हे भूसंपादन पुढील १५ दिवसांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. संबधित जागा मालकांना मोबदला मिळाल्यानंतर रस्त्याचे अर्धवट राहिलेले काम पूर्ण केले जाणार आहे. सध्या हे काम अंतिम टप्प्यात आले असून, भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले.

### खांब हलविण्यासाठी ३४ कोटींचा निधी

» 'शहरातील पदपथांवर महावितरणचे फीडर पॉइंट (डीपी) बसविण्यात आले आहेत. यांची संख्या सुमारे अडीच ते तीन लाखांच्या घरात आहे. पदपथांवर हे डीपी असल्याने पादचाऱ्यांना चालताना त्रास होतो. नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होतो. त्यावरही तोडगा काढला जाणार आहे. काही भागांतील रस्ते रुंद केल्यानंतर जुने विजेचे खांब अद्यापही तसेच ठेवण्यात आलेले आहेत. महावितरण कंपनीकडे पाठपुरावा केल्यानंतर निधी नसल्याचे कारण दिले जाते. रस्त्यांवर असलेल्या विजेच्या खांबांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. त्यामुळे महापालिकेने अंदाजपत्रकात ३४ कोटी रुपयांचा निधी खांब हलविण्यासाठी ठेवल्याचे आयुक्त राम यांनी सांगितले.

### ओव्हर हेड केबल बाबतचे धोरण

» 'शहरातील अनेक भागांतील पदपथांवर तसेच ओव्हर हेड केबलमुळे अडथळा निर्माण होते. विद्युत खांब, झाडे यांच्यावरून मोठ्या प्रमाणात इंटरनेटच्या केबल टाकल्या जातात. त्या बाबतचे धोरण महापालिकेकडे नाही. त्यामुळे जबाबदारी निश्चित करताना अनेकदा मर्यादा येतात. त्यामुळे या बैठकीत शहरातील ओव्हर हेड केबल बाबतचे धोरण पुढील एका महिन्यात तयार करून शहर परिवर्तन कक्षाच्या बैठकीत ठेवावे, अशा सूचना करण्यात आल्या आहेत.

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना महापालिकेचा दिलासा, आता 'त्या' योजनेचा मिळणार लाभ....

## 2005 नंतर रुजू झालेल्या आणि नवीन निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांनाही आता महापालिकेच्या अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेचा लाभ मिळणार

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या सेवेत २००५ नंतर रुजू झालेल्या आणि नवीन निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांनाही आता महापालिकेच्या अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेचा लाभ मिळणार आहे. यापूर्वी या कर्मचाऱ्यांना योजनेतून वगळण्यात आले होते. मात्र, आता या कर्मचाऱ्यांचा योजनेत समावेश करण्यात आला असल्याची माहिती महापालिकेचे सहाय्यक आरोग्य प्रमुख डॉ. संजीव वावरे यांनी दिली.

महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजना राबविण्यात येते. या योजनेत महापालिकेचे सेवक, सेविका, सेवानिवृत्त कर्मचारी, शिक्षण मंडळ तसेच पीएमपीएमएल विभागातील सेवक व सेवानिवृत्त कर्मचारी यांचा समावेश आहे. कर्मचारी सेवेत असताना किंवा सेवा निवृत्त झाल्यानंतर निवृत्तीवेतनातून सभासदत्वासाठीचा निधी वळता करून घेण्यात येतो.

या योजनेअंतर्गत महापालिकेच्या पॅनेलवरील खासगी रुग्णालयांमध्ये आंतररुग्ण विभागात उपचार घेतल्यास जनरल वॉर्डसाठी सीजीएचएस मान्य दरानुसार एकूण वैद्यकीय खर्चाच्या ९० टक्के रक्कम महापालिकेमार्फत संबंधित रुग्णालयाला अदा केली जाते. उर्वरित १० टक्के रक्कम तसेच दरातील फरक संबंधित कर्मचाऱ्यांना स्वतः भरावा लागतो.

मात्र, २००५ नंतर सेवेत रुजू झालेल्या आणि नवीन पेन्शन योजना लागू असलेल्या महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना या निर्णयातून वगळण्यात आले होते. त्यामुळे सेवा निवृत्त झाल्यानंतर या कर्मचाऱ्यांना वैद्यकीय उपचारासाठी कोणतीही सुविधा उपलब्ध नव्हती. ही बाब लक्षात घेऊन कामगार संघटनांकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता.




### योजनेचा लाभ

» या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्तांनी डिसेंबर २०२५ मध्ये या कर्मचाऱ्यांनाही योजनेत समाविष्ट करण्यास मान्यता दिली होती. मात्र, या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन नसल्याने सभासद शुल्क निश्चित करण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. अखेर यावर निर्णय घेण्यात आला असून, सेवा निवृत्तीच्या शेवटच्या वेतनातील मूल वेतन आणि महागाई भत्त्याच्या रकमेनुसार संपूर्ण वर्षाचे सभासद शुल्क घेऊन त्यांना योजनेचा लाभ दिला जाणार असल्याचे डॉ. वावरे यांनी स्पष्ट केले.

# कात्रज-कोंढवा रस्त्यासाठी 15 दिवसांत भूसंपादन करणार

## आयुक्त राम आणि जिल्हाधिकारी डूडी यांनी मांडली स्पष्ट भूमिका, वर्षभरात शहराच्या दैनंदिन व्यवस्थापनात आमूलाग्र बदलाचा निर्धार

**पुणे | प्रतिनिधी**

कात्रज-कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणासाठी आवश्यक असलेले भूसंपादन पुढील पंधरा दिवसांत पूर्ण करून जागेचा ताबा मिळवण्यात येईल. तसेच खडी मशीन चौक ते उंड्री रस्ता प्रादेशिक विकास आराखड्यानुसार विकसित करण्यात येईल. समाविष्ट गावांतील किमान एक प्रमुख रस्ता आणि १२ 'मिसिंग लिंक'च्या कामासाठी आगामी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात येणार आहे. पुणे ग्रँड टूर निमित्त तयार करण्यात आलेल्या रस्त्यांवर कोणत्याही प्रकारची खोदाई करण्यात येणार नाही, अशी स्पष्ट भूमिका महापालिका आयुक्त नवल किशोर राम आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत मांडली.

शहरातील स्वच्छता, रस्ते, वाहतूक यांसारख्या दैनंदिन व्यवस्थापनाच्या कामांमध्ये विभागांमध्ये समन्वय साधून पुढील वर्षभरात पुण्याचा 'चेहरा-मोहरा' बदलण्याच्या उद्देशाने 'परिवर्तन कक्षा'ची स्थापना करण्यात आल्याची माहितीही या वेळी देण्यात आली. या कक्षातील विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची महापालिकेत बैठक झाल्यानंतर राम आणि डूडी यांनी माध्यमांशी संवाद साधला.

आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले की, नऊ वर्षांनंतर महापालिका निवडणूक झाली असून अनेक नवीन नगरसेवक आणि अधिकारी सेवेत दाखल झाले आहेत. पुणे ग्रँड टूर सायकल स्पर्धेच्या निमित्ताने पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका, जिल्हाधिकारी कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलिस, पीएमआरडीए, बीएसएनएल, वीज मंडळ अशा विविध विभागांनी एकत्र येऊन विक्रमी वेळेत पुण्यासह जिल्ह्यात ४५० किलोमीटरचे दर्जेदार रस्ते तयार केले. या रस्त्यांवर स्वच्छता आणि सुशोभिकरणही झाले. 'सर्व विभागांनी समन्वय ठेवून काम केल्यास उपलब्ध संसाधनांमध्येच शहरातील विकासकामे आणि दैनंदिन सुविधांमध्ये मोठा बदल घडू शकतो, हे या उपक्रमातून स्पष्ट झाले,' असे राम यांनी नमूद केले.

या पार्श्वभूमीवर पुढील वर्षभराचे लक्ष ठेवून शहरातील तसेच जिल्ह्यातील लगतच्या भागातील दैनंदिन सुविधा अधिक दर्जेदार करण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. आजच्या बैठकीत प्रत्येक विभागाचे दुसऱ्या विभागाशी संबंधित काम काय आहे, यावर चर्चा करण्यात आली. यापुढे सर्व विभागांची दर महिन्याला संयुक्त बैठक घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



### अतिक्रमण, होर्डिंग्जबाबत कठोर भूमिका

» रस्ते रुंद करण्यासाठी अतिक्रमणावर कारवाई करावी लागणार असून त्यासाठी विशेष ड्राइव्ह राबवण्यात येईल, असे आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले. 'दैनंदिन प्रशासनाची ड्युटी प्रामाणिकपणे केली तरी शहरातील ५० टक्के प्रश्न सुटू शकतात,' असे त्यांनी स्पष्ट केले. यावर्षी समाविष्ट प्रत्येक गावातील किमान एक मुख्य रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येईल. तसेच ३० पैकी १२ 'मिसिंग लिंक'चे काम पूर्ण करण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आली आहे. शहरातील बेकायदा होर्डिंग्ज आणि ओव्हरहेड केबलच्या संदर्भातही कठोर निर्णय घेण्यात येतील, असे राम यांनी स्पष्ट केले.

### शहरातील प्रदूषण रोखणे गरजेचे

» शहरातील प्रदूषण वाढत असल्याने ते रोखणे गरजेचे असल्याचे डूडी यांनी सांगितले. सायकल स्पर्धेच्या काळात बांधकामावर काही बंधने आणण्यात आली होती. मात्र जुनी वाहने रस्त्यांवर येऊ नयेत यासाठी प्रयत्न झाले नाहीत, असेही त्यांनी नमूद केले. 'आम्ही स्पोर्ट्सचा वापर करून इन्फ्रास्ट्रक्चर मजबूत करण्याचा प्रयत्न करीत आहोत. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी संघटना आणि नागरिकांची मदत लागणार आहे,' असे त्यांनी सांगितले.

### वेळेत आणि दर्जेदार सेवा देणे आवश्यक

» डूडी यांनी पुढे सांगितले की, २०२६ पर्यंत आणखी रस्त्यांचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. पुण्याला 'ग्लोबल सिटी' म्हणून विकसित करत असताना त्यासाठी वेळेत आणि दर्जेदार सेवा देणे आवश्यक आहे. दीड हजार किलोमीटर रस्त्यांचे लक्ष्य निश्चित करण्यात आले असून त्यामध्ये सर्व विभागांनी एकजुटीने काम केले आहे. पुढील टप्प्यात जे रस्ते करणार आहोत त्यांची यादी देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# 'उजनी' मृत्यूपंथाला? वाढते प्रदूषण आणि प्रशासनाचे दुर्लक्ष

## टीडीएस 700 वर; जैवसाखळी कोलमडली, मानवी आरोग्य व शेतीही धोक्यात

**पुणे | प्रतिनिधी**

वाढत्या प्रदूषणामुळे 'उजनी' जलाशय काळवंडला आहे. त्यामुळे या जलाशयाचा आक्रोश दिवसेंदिवस वाढत चालला आहे. 'उजनी' धाय मोकलून रडत आहे, तो आता आजारी पडला आहे. अखेरच्या घटका मोजत आहे. तरीही सरकार व प्रदूषण मंडळाचे 'उजनी'कडे दुर्लक्ष आहे. परिणामी, आता 'उजनी'ला मृत घोषित करण्याची वेळ आल्याची संतप्त भावना व्यक्त केली जात आहे.

गेल्या 20-25 वर्षांपासून 'उजनी'तील प्रदूषणाची चर्चा केवळ चघळली जात आहे. राज्य, देशासह अगदी परदेशातील आंतरराष्ट्रीय जलतज्ज्ञ, शास्त्रज्ञांनी देखील 'उजनी'च्या प्रदूषित पाण्याविषयी चिंता व्यक्त केली आहे. तसेच, पाणी वापरण्यायोग्य राहिले नसल्याचे सांगत आले आहेत. त्यामुळे 'उजनी'च्या प्रदूषणाला अजून किती दाखले द्यायचे? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

'उजनी'च्या प्रदूषणाने जलाशयातील पानवनस्पती नामशेष झाल्या आहेत. शंख, शिंपले, खेकडे यांसह लहान जीवजंतू नष्ट होऊन जैविक साखळी गळून पडली आहे. देशी माशांच्या प्रजाती अखेरच्या घटका मोजत आहेत. आता फक्त बाकी आहे ते रोगराईचे महासंकट आणि त्यातून होणारी नैसर्गिक हानी. हे जीवन-मरणाचे संकट हाताबाहेर गेल्यानंतरच सरकार व प्रदूषण मंडळ जागे होणार का? असा संतप्त प्रश्न 'उजनी'च्या वाढत्या प्रदूषणाकडे पाहून निर्माण झाला आहे.





### पाण्याचा 'टीडीएस' 700 वर

» जानेवारी 2026 मध्ये भारतातील सर्वांत मोठ्या बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीच्या पाणी तपासणीत देखील धक्कादायक बाबी उघड झाल्या आहेत. यामध्ये पाण्याचा टीडीएस 700 वर पोहचला. इतर घटकांनी धोक्याची पातळी गाठली असल्याचे पुढे आले आहे. यातून उरल्यासुरल्या जलचारांसाठी तणावपूर्ण स्थिती निर्माण होऊन त्यांचा अधिवास धोक्यात आल्याचे स्पष्ट केले आहे.

### मानवी आरोग्य धोक्यात

» 'उजनी'काठच्या गावागावांत कॅन्सर, मूतखडा व इतरही विकारात प्रचंड वाढ झाल्याचे वैद्यकीय डॉक्टर सांगत आहेत. पिण्याच्या पाण्याचा वापर थांबला असला तरी शेती नापीक होत आहे. पाळीव जनावरांच्या गर्भधारणेवर परिणाम झाला आहे.